# प्रकरण सातवे

## निष्कर्ष आणि सारांश

**प्रस्तावना :**

प्रकरण सातवे म्हणजे प्रस्तुत संशोधन अहवालातील शेवटचे प्रकरण होय. या संशोधन अहवालातील संशोधनाचा उद्देश प्राचीन काळापासून आजपर्यंत भारतीय समाजव्यवस्था आणि राजकीय व्यवस्थेत वेगवेगळया परिस्थितीत राज्यसुधारक आणि समाजसुधारकांचा उदय कसा झाला, भारतावर राज्य करणाऱ्या परकीय ब्रिटिश राजवटीला विरोध करण्यासाठी वेगवेगळ्या विचारसरणीच्या भारतीय विचारवंतांचा, राजकारण्यांचा उदय कसा झाला? या वेगवेगळ्या विचारसरणीच्या विचारवंतांच्या विचारांचा प्रभाव ब्रिटिश सत्तेवर करण्यात किती पडला याचा अभ्यास करणे, तसेच ब्रिटिशांना स्वातंत्र्य देण्यास भाग पाडणाऱ्या महात्मा गांधींचा उदय भारतीय राजकारणात कसा झाला. त्यांची एकूण विचारसरणी जी गांधीवाद नावाने ओळखली जाते याचा सखोल अभ्यास करणे हा होता. त्याचबरोबर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र्य झाला. भारतीयांना स्वयंशासनाचा अधिकार मिळाला, स्वातंत्र्य आले, गणराज्य आले, भारत प्रजासत्ताक झाला. भूमिपुत्र भारतीय भारताचा राज्यकारभार लोकशाही पध्दतीने पाहू लागले; परंतु राज्यकर्त्यांना स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काही वर्षातच आपल्या कर्तव्याचा विसर पडला. राजकारणात भ्रष्टाचार, व्यभिचार वाढला. जनतेचे, राज्याचे कल्याण करण्यासाठी संसदेत, राज्य विधिमंडळात पाठवलेले प्रतिनिधी जनतेचे रक्षक होण्याऐवजी भक्षक होऊ लागले. ग्रामविकास, स्वयंपूर्ण खेडे, स्वावलंबी खेडे हा गांधींचा संदेश विसरला जाऊन गावाचे गावपण, माणुसकी हरवत चालली आहे.

ग्रामीण व शहरी भागात व्यसनधीनता, अविचार, वाढत चालला आहे. अशा परिस्थितीत अन्यायाची चीड असणारा, स्वामी विवेकानंद यांच्या समाजसेवेच्या विचाराने प्रेरित होऊन गांधींच्या विचारसरणीच्या आणि कार्यपध्दतीच्या मार्गाने राज्यव्यवस्थेत व समाजव्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचा उदय कसा झाला, त्यांचे बालपण, कौटुंबीक स्थिती, सैन्यातील जीवन, अन्यायाशी केलेला संघर्ष, त्यांची समाजसेवेमागील प्रेरणा, अण्णा हजारे यांनी निःस्वार्थ भावनेने समाजसुधारणेसाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन शासनाने व वेगवेगळया संस्था, संघटनांनी अण्णा हजारे यांचा पुरस्कार देऊन गौरव केला. त्याचबरोबर महात्मा गांधींनी म्हटल्याप्रमाणे खेडयाकडे चला, ग्रामविकास करा, स्वावलंबी गाव, आदर्श गाव या सर्व गांधी विचारांचा आदर्श डोळयासमोर ठेवून अण्णा हजारे यांनी आपल्या समाजसेवेची आणि देशसेवेची सुरुवात आपल्या मूळ गावापासून म्हणजे राळेगणसिध्दी या गावापासून केली. त्यांनी ग्रामविकासाचा शुभारंभ गावातील जनतेचे श्रध्दास्थान असलेल्या संत यादवबाबा मंदिराच्या जीर्णोध्दाने केला. ग्रामपरिवर्तन करत असताना संघर्ष अटळ होता. ज्यांचा पैसा, सत्ता, प्रतिष्ठा, काळाबाजार कमी होणार होता अशा काही व्यक्तींनी अण्णा हजारे यांना विरोध केला; पण कधी आई बनून तर कधी आईच्या नात्याने धाकदपटशा दाखवून अण्णा हजारे यांनी तो विरोध शमविला व गावकऱ्यांना सोबत घेऊन श्रमदानातून राळेगणसिध्दी गावात सामाजिक, राजकीय, आर्थिक परिवर्तन घडवून आणले. वृक्षारोपण, जलसंधारण, पाणलोट क्षेत्र विकास, नशाबंदी, चराईबंदी, कुऱ्हाडबंदी, नसबंदी अशी वेगवेगळी सूत्र अवलंबून राळेगणसिध्दीमध्ये अण्णा हजारे यांनी

परिवर्तन घडवून आणले. आज राळेगणसिध्दीमध्ये हिरवेगार शिवार आहे, गोठ्यात खिल्लार आहे. त्यामुळे राळेगणसिध्दी आज महाराष्ट्रातील एक आदर्श गाव म्हणून प्रसिध्द आहे. ज्याचा आदर्श देशातील इतर राज्यातील जनता ही प्रत्यक्ष भेट देऊन पहाणी करुन घेत आहेत. याची नोंद या अहवालातील चौथ्या प्रकरणात सविस्तर घेण्यात आली आहे.

या संधोधन अहवालातील पाचवे प्रकरण जे माहितीचा अधिकार, ग्रामसभा, आणि इतर कायदे पारित करण्यासाठी अण्णा हजारे यांचे योगदान या नावाने समाविष्ट करण्यात आले आहे, त्याचे मुख्य संशोधन उद्दिष्ट होते, की ब्रिटिशांनी भारतात राज्यकारभार करताना आपल्या सोयीसाठी शासनात आणि प्रशासनात घेतलेले निर्णय गोपनीय राहावेत यासाठी 'गोपनीयतेचा कायदा' केला होता. आपण कशा पध्दतीने भारतीयांनी लूट करत आहोत हे भारतीयांना कळू न देणे हाच या गोपनीयतेच्या कायद्यामागील ब्रिटिशांचा उद्देश होता असे म्हणता येईल. भारतीयांनी वेगवेगळ्या मार्गांने संघर्ष करुन ब्रिटिशाकडून स्वातंत्र्य हस्तगत केले. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला, भारत प्रजासत्ताक झाला, गणराज्य येऊनही गोपनीयतेचा कायदा रद्द झाला नाही, त्यामुळे ब्रिटिश राजवटीत जशी शासकीय, प्रशासकीय माहिती गोपनीयतेच्या नावाखाली गोपनीय ठेवली जायची तशीच पध्दती स्वातंत्र्योत्तर काळातही भारतीय राज्यकर्त्यांनी कायम ठेवली. त्यामुळे शासनात, प्रशासनात घडणाऱ्या घटनांच्या माहितीपासून भारतीय जनता दूर होती; परंतु ही बाब जेव्हा अण्णा हजारे यांच्या व त्याच्या सहकाऱ्यांच्या लक्षात आली तेव्हा शासनात आणि प्रशासनात घडणाऱ्या सर्व घटनांची माहिती (राष्ट्रीय हितास, ऐक्यास बाधा आणणारी किंवा राष्ट्रीय सुरक्षेला

बाधा आणणारी माहिती वगळता) जनतेला मिळावी यासाठी माहितीचा अधिकार किंवा कायदा व्हावा यावर अण्णा ठाम झाले. आपल्या सर्व सहकाऱ्यांना सोबत घेऊन आंदोलने, उपोषणे करुन तर कधी सरकारशी भेटीगाटी, बैठका घेऊन, पत्रव्यवहार करुन, अनेक संकटाना तोंड देत माहितीचा अधिकार सरकारकडून पारित करुन घेतला. त्याचबरोबर ग्रामसभेला अधिकार मिळवून देण्यात अण्णा हजारे यांनी भरिव योगदान दिले. ग्रामसभा ही गावची संसद आहे. लोकशाहीतील सर्वोच्च व्यवस्था आहे. ती सार्वभौम, स्वयंभू आहे. त्यामुळे ग्रामसभेला जादा अधिकार द्यावेत अशी अनेक वर्षे जनतेची मागणी होती. वेळोवेळी सरकारशी पत्रव्यवहार करुन, आंदोलने केल्यामुळे महाराष्ट्र शासनाने ग्रामसभेला जादा अधिकार देण्याबाबत कायदे केले आहेत. त्याचबरोबर शासकीय कामातील पारदर्शकता वाढावी, दप्तर दिरंगाई दूर व्हावी यासाठी दप्तर दिरंगाईचा कायदा, सरकारी कर्मचाऱ्यांकडून पदाचा होणारा गैरवापर आणि आपल्या सोइच्यासाठी आपल्या मर्जीतील अधिकाऱ्याची आपल्या कक्षेत नियुक्ती करण्यासाठी वारंवार होणाऱ्या बदल्या याची दखल घेऊन अण्णा हजारे यांनी बदल्यासंबंधित कायदा पारित करुन घेतला. अर्थात यासाठी अण्णा हजारे यांना कठोर संघर्ष करावा लागला. त्यासाठी विविध मार्गांनी प्रयत्न करावे. यांनी योगदान द्यावे लागले. यावर संशोधन व्हावे तसेच माहितीचा अधिकार, त्याचे सर्व स्वरुप, प्रक्रिया, ग्रामसभेला जादा अधिकाराचा कायदा, त्याचे स्वरुप, त्यातील महत्त्वपूर्ण बाबी, दप्तर दिरंगाईचा कायदा, बदल्यांसंबंधीचा कायदा याची सविस्तर माहिती संकलित करुन संशोधन करणे हादेखील या प्रकरणाच्या अध्ययनामागील प्रमुख संशोधन-उद्देश होता.

या संशोधन अहवालातील सहावे प्रकरण म्हणजे भ्रष्ट्राचार विरोधीजन अंदोलनन्यास हे होय. या प्रकरणात भ्रष्टाचार म्हणजे काय? त्याची कारणे आणि उपाय, भ्रष्टाचारविरोधी जनअंदोलन न्यास ही काळाची कशी गरज आहे, भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यासाचे ध्येय, भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यासाची उद्दीष्टे, त्याची मार्गदर्शक तत्त्वे, आणि त्याची एकूण कार्यकारिणी आणि कार्य करण्याची पध्दती याचा सविस्तर संशोधनात्मक अभ्यास करुन भ्रष्टाचारविरोधी कार्य करण्याची पध्दती याचा अभ्यास करणे हा या प्रकरणाच्या संशोधनात्मक अभ्यासामागील उद्देश होता.

थोडक्यात वरील विश्लेषणावरुन हे स्पष्ट होते, की प्रस्तुत संशोधन अहवालातील प्रत्येक प्रकरणाचा सविस्तर अभ्यास करुन संशोधन-उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रत्येक प्रकरणाचा बारकाईने संशोधनात्मक अभ्यास केल्यानंतर काही निश्कर्ष समोर येतात. त्या सर्व निष्कर्षांची नोंद या शेवटच्या आणि अंतिम प्रकरणात आपण करणार आहोत. वरील सहा प्रकरणांतून जे निश्कर्ष समोर येतात, ते पुढील प्रमाणे सांगता येतील :

१) अनादी काळापासून भारतीय समाज व्यवस्था आणि राजकीय व्यवस्थेत ज्या-ज्या वेळी अध:पतन झाले त्या-त्या वेळी त्या समाजव्यवस्थेत आणि राजकीय व्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी युगपुरुषांचा उदय झाला असे धर्मग्रंथ, वेगवेगळ्या कथा आणि आख्यायिकांवरुन स्पष्ट होते.

२) मध्ययुगात अनेक वर्षे भारतावर मोगल राज्यकर्त्यांची आक्रमणे झाली. काही प्रांत जिंकून भारतात सत्ता स्थापन केली आणि तिचा प्रसार संपूर्ण भारतभर केला. या काळात संपूर्ण भारतीय राजकीय व्यवस्था आणि समाज व्यवस्था दडपशाहीने बोकाळली होती. त्या स्थितीत भारतीय समाजव्यवस्था आणि राजकीय व्यवस्थेतील अध:पतन दूर करुन सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक, वैचारिक विकास करण्यासाठी संत, महात्म्यांचा उदय झाला. म्हणजे मध्ययुगात संतपरंपरा उदयास आली.

३) इ. स. १६०० मध्ये ब्रिटिश व्यापाऱ्यांनी भारतात व्यापाराच्या निमित्ताने ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली. व्यापार करत असताना राजकीय व्यवस्थेत प्रवेश करुन भारतात राजकीय सत्ता स्थापन केली. राज्यकारभाराच्या सोयीसाठी सुशिक्षित तरुणांची गरज भासू लागली. म्हणून ब्रिटिशांनी भारतात शिक्षण संस्था सुरु केल्या. प्रशासनासाठी कारकून घडवणे हा ब्रिटिशांचा उद्देश असला तरी काही स्वाभिमानी सुशिक्षित तरुणांनी ब्रिटिश सत्तेचा डाव ओळखला आणि ब्रिटिश सत्तेच्या अत्याचाराला, शोषणाला विरोध करत भारतीय समाजव्यवस्था आणि राजकीय व्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रबोधनाला सुरुवात झाली. त्यात राजा राममोहन रॉय, स्वामी विवेकानंद, स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा फुले यांची उदाहरणे सांगता येतील.

४) विसाव्या शतकात ब्रिटिश शासनव्यवस्थेच्या शोषणाला, अत्याचाराला विरोध करण्यासाठी आणि भारतमातेला ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी भारतीय राजकारणात एक नविन नेतृत्व उदयास आले. ते म्हणजे बॅ. मोहनदास करमचंद गांधी यांचे होय. त्यांनी १९२० ते १९४७ या काळात ब्रिटिश सत्येला सत्य, अहिंसा, सत्याग्रह, असहकार आदी विविध मार्गांनी स्वातंत्र्य देण्यास भाग पाडले. तो काळ गांधीयुग म्हणून संबोधला जातो. थोडक्यात विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतीयांची शोषण, अराजकतेतून मुक्तता करण्यात अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी प्रयत्न केले असले तरी गांधींचा वाटा मोलाचा होता.

५) १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. भारतीयांना स्वयंशासनाचा हक्क मिळाला. स्वातंत्र्य आले, गणराज्य आले. आता शोषण, अन्याय, अत्याचार, गरिबी आणि प्रगती-उन्नतीचे स्वप्न भारतीय जनता पाहू लागली; मात्र स्वातंत्र्यानंतर काळ बदलला आणि शासनात प्रशासनात विकासापेक्षा त्याच्या अधिक पटींनी व्यभिचार, भ्रष्टाचार वाढत गेला. म्हणजे स्वातंत्र्य मिळूनदेखील शुध्द स्वातंत्र्याला भारतीय जनता पोरकी होत गेली.

६) अशा बिकट स्थितीत भारतीय शासनात वाढलेला भ्रष्टाचार, व्यभिचार, समाजव्यवस्थेतील सांस्कृतिक अवहेलना, व्यसनाधीनता नष्ट करण्यासाठी आणि गांधी विचारांच्या मार्गाने व स्वामी विवेकानंद याच्या विचारांच्या प्रेरणेने भारतीय

राजकीय व्यवस्थेत आणि समाजव्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने एक नवीन नेतृत्व उदयास आले, ते म्हणजे आजचे ज्येष्ठ समाजसेवक पद्मश्री अण्णा हजारे यांचे होय. प्रस्तुत संशोधन अहवालानुसार महात्मा गांधी आणि ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या कार्यपध्दतीत साम्य अढळून येते.

७) गांधीवाद अध्ययनात गांधींच्या जीवनचरित्राच्या अध्ययनावरुन हे स्पष्ट होत, की गांधींच्या बालमनावर सुसंस्कार करण्याचे कार्य त्यांच्या आईने फार मोठ्या प्रमाणावर केले. आध्यात्मिक संस्कार, सत्य, अन्यायाचा प्रतिकार या मूल्यांची शिकवण गांधींना त्यांच्या मातेकडून मिळाली. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या चरित्राच्या अध्यायनांतूनही हे आढळून येते, की त्यांच्यावर त्यांच्या मातेकडून मोठ्या प्रमाणात नैतिक मूल्यांचे संस्कार बालपणीच झाले. आध्यात्मिक संस्कार, खोटे बोलू नये, सत्य आचरण करावे, अन्यायाचा प्रतिकार करावा इत्यादी.

८) महात्मा गांधी आणि ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास केल्यास आणखी एक निश्कर्ष काढता येतो, तो म्हणजे दोघांची परमेश्वरावर अगाध श्रध्दा आहे. गांधीं म्हणतात, "मी एक वेळ अन्न पाण्यावाचून राहीन. परंतु परमेश्वरावरील श्रध्देशिवाय जगू शकत नाही." ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचीदेखील परमेश्वरावर अगाध श्रध्दा आहे. आपल्या प्रत्येक शुभकार्याची सुरुवात श्रीक्षेत्र आळंदी येथील ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणस्पर्शाने करतात. त्याचबरोबर

आपल्या आयुष्यातील बरीच वर्षे अण्णा चातुर्मासाच्या निमित्ताने श्रीक्षेत्र पंढरपूर येथे जायचे आणि ईश्वरभक्तीत तल्लीन व्हायचे.

९) महात्मा गांधींची पवित्र धर्मग्रंथ 'श्रीमद् भग्वदगीता' ग्रंथावर अत्यंत श्रध्दा होती. अनेक वेळा गांधींनी असे मत मांडले, की मी ज्या-ज्या वेळी संकटात सापडलो, मार्ग दिसत नव्हते, ज्या - ज्या वेळी अंधकार समोर येत होता त्या - त्या वेळी 'श्रीमद्भगवद्गीता' या धर्मग्रंथाने मला संकटातून तारले, मार्ग दाखवला, ज्ञानाचा प्रकाश दिला. त्यांनी एका ठिकाणी असे नमूदही केले आहे की, श्रीमद् भगवद्गीतेतील दुसऱ्या अध्यायातील ६२ व ६३ व्या श्लोकाने मला प्रभावित केले. त्याचप्रमाणे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्यावरही 'श्रीमद् भगवद्गीता' या धर्मग्रंथाचे अनुवादरुप मानल्या गेलेल्या 'ज्ञानेश्वरी' या धर्मग्रंथाचा प्रभाव आहे. 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाच्या १४ व्या अध्यायातील २३३ व्या ओवीचा त्यांच्यावर विलक्षण प्रभाव होता.

१०) गांधींचा अन्यायी विचारांना व अन्यायी कृतीला विरोध होता. तसे अनेक दाखले त्यांच्या जीवनचरित्राच्या अध्ययनातून आढळून येतात. त्याचे एक छोटे उदाहरण म्हणजे दक्षिण आफ्रिकेत रेल्वे प्रवासात त्यांना कृष्णवर्णीय म्हणून मिळालेली वागणूक आणि त्या भेदाविरोधात त्यांनी केलेले न्यायप्राप्तीचे प्रयत्न अगदी त्याचप्रमाणे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे हे देखील अन्यायाच्या विरोधात आहेत. बालपणापासून

अन्याय करणाऱ्याला विरोध केला. अन्यायी, अत्याचारी यांच्या विरुध्द अण्णा हजारे पेटून उठतात. हा एक महत्त्वपूर्ण निष्कर्ष म्हणता येईल.

११) गांधींच्या मते, व्यक्तीने सत्य सोडू नये. व्यक्तीचे आचरण सत्य असावे. कारण सत्याच्या आधारे व्यक्ती परमेश्वरापर्यंत पोहचू शकतो. त्याचप्रमाणे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी सत्याची कास कधी सोडली नाही. सत्यप्राप्तीसाठी अन्यायाचा सदैव प्रतिकार केला. हे अण्णांच्या आजपर्यंतच्या वाटचालीतून प्रत्ययास येते.

१२) अहिंसा ही गांधीविचारसरणीतील एक अनमोल देणगी होय. अहिंसेच्या मार्गाने समाजपरिवर्तन घडवून आणावे. गांधीजींना शूराची अहिंसा अपेक्षित होती. अगदी त्याचप्रमाणे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आपल्या सामाजिक आणि राजकीय कार्याच्या सुरुवातीपासून आजपर्यंत अहिंसात्मक मार्गाने कार्य केले असे स्पष्ट होते.

१३) अन्यायी, अत्याचारी व्यक्ती, सरकार यांना विरोध करण्यासाठी गांधींनी जगाला एक अनमोल देणगी दिली, ती म्हणजे सत्याग्रह. अहिंसात्मक प्रतिकाराने अन्यायी, अत्याचारी व्यक्ती, शासनात हृदयपरिवर्तन घडवून आणण्यासाठी गांधींनी उपोषण, सविनय कायदेभंग, अहिंसात्मक आंदोलने आदी मार्गांचा अवलंब केला. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या कार्यात्मक वाटचालीत सत्याग्रहाच्या साधनांचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याचेही मान्य करावे लागते.

१४) महात्मा गांधींचा अस्पृश्यतेला विरोध होता. सर्व माणसे समान आहेत. कुणी श्रेष्ठ नाही कूणी कनिष्ठ नाही असे त्यांचे मत होते. अस्पृश्यांना कुणीही अस्पृश्य म्हणू नये म्हणून त्यांनी 'हरिजन' हा शब्द वापरला होता. त्याचप्रमाणे अण्णा हजारेदेखील अस्पृश्यतेला विरोध करतात. त्याचेच उदाहरण म्हणजे गावकऱ्यांना जागृत करुन त्यांनी गावातील दलितांच्या शेतीवरील कर्जाची फेड सामूहिक श्रमदानातून केली, तसेच गावात बैलपोळा सणाच्या दिवशी गावातील दलितांच्या बैलांना पहिला मान दिला जातो. थोडक्यात अस्पृश्यतेला अण्णा हजारेंचा गांधींप्रमाणेच विरोध होता.

१५) गांधींच्या विचारसरणीचा सर्वधर्म समभाव संकल्पना हा एक महत्त्वाचा पैलू होय. गांधींची हिंदू धर्मावर खूप श्रध्दा होती; मात्र इतर धर्मांबद्दल त्यांना खूप आदर होता. सर्व धर्मग्रंथ सत्याच्या आधाराने परमेश्वराकडे जाण्याचा संदेश देतात. म्हणून गांधींनी कुराण, बायबल आदी धमग्रथांचे वाचन केले होते. त्याचप्रमाणे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या सामाजिक, राजकीय वाटचालीतून सर्वधर्मसमभाव आढळून येतो. उदा. राळेगणसिध्दी येथे प्रतिवर्षी संपन्न होणारा सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा, त्यांच्या सर्व आंदोलनांना त्यांना मिळालेली सर्व धर्मिय कार्यकर्त्यांची साथ पाहून हे स्पष्ट होते.

१६) महात्मा गांधीं आणि ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या विचारामध्ये आणखी एक साम्य आढळूण येते ते म्हणजे दोघांनीही 'खेडे' हा विकासाचा केंद्रबिंदू मानला.

गांधीजी म्हणतात, ‘खेडे हे भारताचे हृदय आहे.’ म्हणून ‘खेड्याकडे चला’ असा संदेश त्यांनी दिला. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी देखील ग्रामविकासाला महत्त्व दिले. म्हणून त्यांनी आपल्या सामाजिक आणि राजकीय कार्याची सुरुवात आपल्या राळेगणसिध्दी या गावापासून केली, जे गाव आज महाराष्ट्रात एक आदर्श गाव म्हणून परिचित आहेच. भारतातील इतर राज्यांनीही या गावाचा आदर्श घेत या गावाला वेळोवेळी भेटी दिल्या.

१७) महात्मा गांधींच्या विचारसरणीत ग्रामविकासाला महत्त्वाचे स्थान होते. आदर्श गावे, स्वावलंबी खेडी, स्वयंपूर्ण खेडी भारतात निर्माण व्हावीत. गावातील जनतेच्या संपूर्ण गरजा गावात भागवल्या जाव्यात अशी गांधींची जशी धारणा होती तीच धारणा ठेवून अण्णा हजारे यांनी आपल्या कार्याची सुरुवात आपल्या राळेगणसिध्दी या छोट्याशा गावापासून केली. जे गाव आज स्वावलंबी, स्वयंपूर्ण झाले आहे. या आदर्श गावाची प्रेरणा घेऊन महाराष्ट्रातील इतर गावांनीही आपला विकास साध्य केला. ज्यात अहमदनगर जिल्ह्यातील हिवरे बाजार या गावाचा उदाहरणास्तव उल्लेख करता येईल.

१८) गांधींच्या विचारसरणीमध्ये ‘नशाबंदी’ या तत्त्वाला महत्त्वाचे स्थान होते. नशा करणारी व्यक्ती नशेत स्वतःच्या शरीर आणि बुध्दी वरील नियंत्रण ठेवू शकत नाही. त्यामुळे नशापान करणारी व्यक्ती हिंसक बनते. म्हणून व्यक्तीने नशा करु नये दारु प्राशन करु नये, किंवा कोणत्याही नशा निर्माण करणाऱ्या मादक पदार्थाचे सेवन करु नये असे

गांधीजी म्हणत. गांधींच्या विचारसरणीतील या तत्त्वांचा अवलंब ज्येष्ठ समाजसुधारक अण्णा हजारे यांनीही केला. नशेमुळे व्यक्तीच्या शरीराचा आणि बुध्दीचा नाश होतो. यावर प्रबोधन करुन अण्णा हजारे यांनी नशाबंदीची सुरुवात आपल्या राळेगणसिध्दी या गावापासून केली. आज राळेगणसिध्दी या गावात दारु, आणि त्याचबरोबर इतर कोणत्याही मादक पदार्थाचा व्यापार होत नाही. त्याचबरोबर कुणीही त्याचे सेवन करत नाही. म्हणून राळेगणसिध्दी हे आज देशपातळीवरील एक आदर्श गाव म्हणून उभे आहे.

१९) महिलोध्दार किंवा महिलांचा सर्वांगीण विकास या बाबतीतदेखील म. गांधीजी आणि ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या विचारामध्ये साम्य आढळून येते. महिलांची, स्त्रियांची कुचंवणा न करता स्त्रियांना सन्मानाची वागणूक देऊन, त्यांचा आदर करावा असे गांधींचे मत होते. त्यांना समाजात सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सर्व क्षेत्रांत सहभागी करुन घेऊन त्यांना प्रतिष्ठा द्यावी असे गांधींचे मत होते. म्हणून गांधीजींनी राबविलेल्या प्रत्येक चळवळीत, प्रत्येक आंदोलनात, सत्याग्रहात स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी होत. त्याचप्रमाणे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या एकूण कार्यात्मक वाटचालीतील चळवळीमध्ये, आंदोलनात, सत्याग्रहाच्या विविध साधनांचा आधार घेत केलेल्या चळवळीत महिलांची संख्या अधिक आहे, हे दिसून येते.

२०) महात्मा गांधी आणि ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या शैक्षणिक विचारातही मोठ्या प्रमाणात साम्य दिसून येते. ब्रिटिशांना आपले प्रशासन चालविण्यासाठी इंग्रजी बोलता येणारे कारकून पाहिजे होते. त्यासाठी त्यांनी जी शिक्षणपध्दती लागू केली होती ती कुचकामी होती. शिक्षण हे श्रमावर आधारित असावे. शिक्षणाद्वारे जातपात न मानणारा व आपल्या शिक्षणाचा उपयोग आपल्या उदरनिर्वाहासाठी करताना त्याने समाजाचे दैन्य व दु:ख दूर करावे अशा पध्दतीने शिक्षणातून स्वतंत्र भारताचा आदर्श नागरिक घडविला जावा ही महात्मा गांधींची विचारधारा होती. भारतीय विद्यार्थ्यांना मूल्याधिष्ठित, श्रमाधिष्ठित व संस्कारक्षम शिक्षणातून आदर्श नागरिकांची नवी पिढी निर्माण झाली तरच स्वराज्याचे सुराज्यात रुपांतर होण्यास मदत होईल अशी गांधींची धारणा होती. तोच आदर्श समोर ठेवून ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी नैतिक मूल्यांचे अधिष्ठान असणाऱ्या मातृभाषेतील शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन करुन मूल्याधिष्ठित, श्रमाधिष्ठित, संस्कारक्षम शिक्षण देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी राळेगणसिध्दीतील संत निळोबाराय विद्यालयात नापास विद्यार्थ्यांसाठी शाळा सुरु केली. ज्यातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पंचसूत्री कार्यक्रम राबवण्यात आला. ज्या सूत्रांमध्ये बलसंवर्धन, श्रमसंस्कार, शीलसंवर्धन, प्रज्ञाविकास, देशप्रेम यांचा समावेश होता. ही पंचसूत्री व त्यावर आधारित उपक्रम राबवून जणू एक

संस्कारकेंद्रच सुरु करण्यात आले आहे. राळेगणसिध्दीतील शाळा म्हणजे ऋषीमुनींच्या व महात्मा गांधींच्या आश्रमशाळेचा आधुनिक आदर्श आहे.

२१) महात्मा गांधींनी स्वावलंबी आदर्श गावनिर्मितीत ग्रामस्वच्छता, ग्रामआरोग्य यांना महत्त्वाचे स्थान दिले होते. आपले आरोग्य आपल्या हाती ही महात्मा गांधींची ग्रामआरोग्याची संकल्पना होती. गांधींच्या या विचारांचे अनुकरण ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी काटेकोरपणे केले, त्यानुसार राळेगणसिध्दीत आरोग्य, स्वच्छता राबवण्याचे काम हाती घेण्यात आले. स्वच्छतेआभावी राळेगणसिध्दीतील ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले होते. गावात नारु, चर्मरोगांचे प्रमाण वाढले होते. याची दखल अण्णा हजारे यांनी घेऊन स्वच्छतेचे महत्त्व गावकऱ्यांना पटवून दिले व ते महत्त्व प्रत्यक्ष कृतीत उतरविले. आज राळेगणसिध्दी जे एक आदर्श गाव आहे, ते आज आरोग्यसंपन्न झाले असून, स्वच्छ मनाच्या लोकांचे स्वच्छ गाव म्हणून ते नावलौकिक पावले आहे.

२२) गांधींच्या विचारसरणीचा पाया धार्मिक व नैतिक स्वरुपाचा आहे. सर्व ठिकाणी त्यांनी नीती व धर्म यांना महत्त्व दिले. धर्म मानवाची मूलभूत गरज आहे असे ते म्हणत. धर्म हेच माझ्या जीवनाचे प्राणतत्त्व आहे, त्याशिवाय मी क्षणभरही जगू शकत नाही असे त्यांनी स्वतः म्हटले होते; पण असे जरी असले तरी त्या धार्मिक विचारात सांप्रदायिकता व साचेबंदपणा यांचा लवलेश नव्हता. गांधीप्रणीत धर्मकल्पनेत ईश्वर,

सृष्टी व मानव यासंबंधी मूलभूत विचार इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. त्यामुळे सर्व धर्म सारखेच पवित्र आहेत. सर्व धर्मांच्या मुळाशी एकच शाश्वत धर्म व तोच विश्वधर्म असे त्यांनी वारंवार सांगितले. तोच आदर्श समोर ठेवून अण्णा हजारे यांनी त्यांच्या कार्याची सुरुवात केली. त्यांनी आपल्या सामाजिक कार्याची १९७५ मध्ये सुरुवात गावातील श्री संत यादवबाबाच्या समाधी मंदिराच्या जीर्णोध्दारातून केली. त्यांची 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथावर अगाध श्रध्दा आहे. त्यातील १४ व्या अध्यायातील २३३ व्या ओवीचा त्यांच्यावर विशेष प्रभाव होता. तसेच त्यांनी आपल्या प्रत्येक कार्याची, आंदोलनाची सुरुवात देवाची आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वरांच्या समाधीचे दर्शन घेऊन केली. अनेक वर्षे श्री क्षेत्र पंढरपूर येथे चातुर्मास केला. असे असले तरी सर्व धर्मांकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन सहिष्णू आहे. त्याचे उदाहरण म्हणजे गावात प्रतिवर्षी संपन्न होणारा सर्व धर्मीय सामुदायिक विवाह सोहळा हा होय किंवा दलितांच्या शेतीवरील ग्रामस्थांच्या श्रमदानातून केलेली कर्जफेड हे होय.

२३) व्यापाराच्या उद्देशाने आलेल्या इंग्रजांनी प्रथम आपल्या देशात ठिकठिकाणी आपल्या वखारी स्थापन केल्या. व्यापारी केंद्रे स्थापन केली. 'फोडा आणि झोडा' या कपटनीतीतून भारतभर आपली सत्ता स्थापन केली आणि भारतीय जनतेला आपले गुलाम बनवले. भारतीय संपत्तीची अधिक लूट करता यावी, अधिकाधिक शोषण करता यावे, याचा कुणाला थांगपत्ता लागू नये, तसेच भारतातील आपली शोषणयुक्त

सत्ता अबाधित राहावी आणि सत्तेची पकड अधिक मजबूत व्हावी यासाठी ब्रिटिश सरकारने १९२३ मध्ये 'कार्यालयीन गोपनीयतेचा कायदा' ('ऑफिशियल सिक्रेट ॲक्ट') तयार केला. या आधारावर भारतमातेला लुटून आपल्या तिजोऱ्या भरल्या. जनतेवर अनन्वित अन्याय, अत्याचार केले. गोपनीयतेच्या कायद्यामुळे भारतीयांना दाद मागता येत नव्हती. न्याय मिळत नव्हता. शेवटी गांधींच्या नेत्वृत्वाखाली करेंगे या मरेंगे या अंदोलनातून देश हादरला आणि १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. थोडक्यात ब्रिटिशांनी राज्य करत असताना भारतीयांचे शोषण करण्यासाठी जे कायदारुपी शस्त्र वापरले होते त्यात गोपनीयतेचा कायदा किंवा ऑफिशियल सिक्रेट ॲक्ट हा एक प्रभावी कायदा होता हे तथ्य मान्य करावे लागेल.

२४) १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला. गोरे बिटिश भारतातून गेले. नंतर १९५० साली लोकशाही पध्दतीने भारताचा घटनात्मक राज्यकारभार सुरु झाला. भारत स्वतंत्र, सार्वभौम, प्रजासत्ताक राष्ट्र झाले. परंतु ते केवळ कागदोपत्रीच. कारण चांगला कारभार चालविण्यासाठी आणि जनतेचा, सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विकास करण्यासाठी जनता आपले प्रतिनिधी केंद्रात आणि राज्यातील कायदेमंडळात पाठवते. ते आपले मालक नसून, आपले सेवक आहेत, तसेच प्रशासकीय यंत्रणेतील सर्व सनदी, राजपत्रित अधिकारी, कर्मचारी हेदेखील आपले सेवक आहेत हे जनतेला कळू दिले जात नव्हते. याच्या विविध कारणांपैकी एक कारण

म्हणजे ब्रिटिशांनी १९२३ मध्ये शोषण करण्यासाठी केलेला 'गोपनीयतेचा कायदा' याचे स्वातंत्र्योत्तर काळातील अस्तित्व जनतेच्या होणाऱ्या शोषणाचा हे एक प्रमुख कारण होते असे म्हणता येईल.

२५) देश आणि राज्याचा कारभार चालवण्यासाठी संपत्तीचे विश्वस्त म्हणून आपण लोकप्रतिनिधी निवडून देतो, ते लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी जनतेचे सेवक आहेत. स्वातंत्र्याचा लाभ जोपर्यंत तळागाळातील गरीब माणसापर्यत पोचत नाही तो पर्यंत स्वातंत्र्याला काही अर्थ नाही असे गांधीं नेहमी म्हणत. हा गांधीविचार समोर ठेवून शासनात आणि प्रशासनात स्वातंत्र्योत्तर काळातही गोपनीयतेच्या कायद्याखाली चाललेली लूट थांबविण्यासाठी अण्णा हजारे यांच्याकडे हजारो तक्रारी आल्या आणि त्याची दखल घेऊन पारतंत्र्यातून भूमी स्वतंत्र झाली असली तरी जनतेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी महात्मा गांधींच्या अहिंसक मार्गाने जनस्वातंत्र्याची दुसरी लढाई लढावी लागेल याची तीव्रतेने जाणीव अण्णा हजारे यांना झाली. ती लढाई म्हणजे 'माहितीच्या अधिकाराची लढाई' होय; त्यासाठी जनतेशी प्रत्यक्ष भेटीगाठी, प्रबोधन सभा घेऊन तसेच वेळोवेळी सरकारशी, भेटीगाठी, प्रत्रव्यवहार, अहिंसक अंदोलने यांव्दारे जे प्रयत्न केले त्यातून जणजागृती, प्रबोधन झाले हे स्पष्ट होते.

२६) 'माहितीचा अधिकार' हा कायदा भारत देशात उशिरा का होईना अस्तित्वात आला. असे नव्हे आंतरराष्ट्रीय स्तरावर विचार करता जवळजवळ २५० वर्षांपूर्वी १७६६ मध्ये स्वीडनमध्ये लागू करण्यात आला. तसेच शंभर वर्षांपूर्वी फ्रान्समध्ये लागू करण्यात आला. १९४६ मध्ये युनोच्या स्थापनेनंतर त्याच्या सनदेतील १९ व्या कलमा अंतर्गत सर्व सदस्य देशांतील नागरिकांना माहितीचा अधिकार प्रदान करण्यात आला. १९६५ मध्ये हा कायदा अमेरिकेने लागू केला. त्याच्या विपरीत मुस्लिम व कमी विकसित देशांत हा कायदा लागू झालेला नाही. आर्श्चयाची बाब म्हणजे लोकशाहीचा मंत्र देणाऱ्या इंग्लंडमध्ये हा कायदा २००५ मध्ये लागू झाला. भारतात १५ जून २००५ रोजी हा कायदा संसदेने स्वीकृत केला आणि १२ ऑक्टोबर २००५ रोजी त्यावर अंमलबजावणी केली गेली. भारतात प्रथमतः तामिळनाडू राज्यात माहितीचा अधिकार कायदा लागू झाला आणि नंतर गोवा, कर्नाटक, आसाम, मध्य प्रदेश, राजस्थान व महाराष्ट्र राज्यातही माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे प्रदान करण्यात आला. आतापर्यंत जगामध्ये ५६ देशांमध्ये नागरिकांना माहितीचा अधिकार देण्याचे कायदे बनवलेले आहेत.

२७) माहितीच्या अधिकाराचा हक्क म्हणजे काय ? या घटकाच्या संशोधनात्मक अध्ययनातून असा एक निश्कर्ष निघतो, की जनता आणि शासन यांचे परस्परसंबंध पूर्णतः वेगळ्यापातळीवर नेत्याचे सामर्थ्य माहितीचा अधिकार या कायद्याने नागरिकांना

प्राप्त झाले आहे शासनाचे अधिकारी आपली कामे व्यवस्थितपणे पार पाडत आहेत किंवा नाही, हे आता या कायद्यामुळे जनतेला समजणार आहे. जे कर्मचारी सचोटीने, प्रामाणिकपणे आपली कामे पार पाडतील त्यांना या कायद्याचा कुठलाही धाक/भीती बाळगावी लागणार नाही. जी माहिती संसदेला किंवा राज्य विधिमंडळाला नाकारली जाऊ शकत नाही अशी कोणतीही माहिती अधिकाऱ्याने पुरविली पाहिजे व गोपनीयतेच्या नावाखाली किंवा अन्य काही कारणाने ती मिळण्यापासून कोणालाही वंचित ठेवता येणार नाही. त्यासाठी जनतेने माहितीच्या अधिकाराचा वापर करताना जनहित, जनकल्याण हाच उद्देश ठेवणे आवश्यक आहे; परंतू केवळ धमकावून अधिकाऱ्याचा/ कर्मचाऱ्यांचा छळ करणे हाच उद्देश असेल तर माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग होत असल्याच्या घटना कायम घडत राहतील व प्रशासन स्वच्छ व गतिमान करण्याचा उद्देश सफल होणार नाही.

२८) माहितीचा अधिकार, त्याचे स्वरुप, प्रक्रिया या घटकाच्या संशोधनात्मक अध्ययनातून असा निष्कर्ष समोर येतो, की माहितीचा अधिकार म्हणजे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियान्वये मिळविता येण्याजोगी माहिती मिळण्याचा अधिकार होय. तसेच माहिती याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा होय. तसेच माहितीचा अधिकार देशातील प्रत्येक नागरिकाला आहे. तसेच ज्या सर्वसाधारण भारतीय व्यक्तीस माहिती

हवी आहे त्यासाठी होणारा खर्चदेखिल सर्वसाधारण व्यक्तीस परवडणारा आहे. त्याचबरोबर जे लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत, त्यांना कुठलेही शुल्क देण्याची गरज नाही.

२९) माहितीच्या अधिकाराच्या कार्यक्षेत्रात केंद्र व राज्य सरकारची सर्व मंत्रालये, विभाग, खाते, गुप्तचर संघटना कार्यालय वगळता पंचायतराज संस्था व स्थानिक नगर विकास संस्था, सरकारी अनुदानावर चालणारी गैर सरकारी संस्था व कार्यालये, केंद्र व राज्य सरकारने यांच्याकडून मंजूर केलेले मंडळ, कारखाने यांचा समावेश होतो. हे माहितीचा अधिकार कायद्याचे अधिकारक्षेत्र असल्याचे या घटकाच्या संशोधनात्मक अध्ययनातून प्रयत्यास येते.

३०) माहितीच्या अधिकारात शासकीय प्राधिकरणांतील माहिती मिळणे बंधनकारक असले, तरी काही विशिष्ट प्रकारची माहिती देणे बंधनकारक नसेल असाही उल्लेख माहितीच्या अधिकारात आहे. त्यात जी माहिती उघड केल्याने भारताच्या सार्वभौमत्वाला किंवा राज्याच्या सुरक्षेला, युध्दतंत्र विषयक, वैज्ञानिक किंवा आर्थिक, परकीय राज्यांसोबतच्या संबंधांना बाधा पोचेल किंवा अपराधास चिथावणी मिळेल अशी माहिती, तसेच कोणत्याही न्यायालयाने किंवा प्राधिकरणाने प्रकाशित करण्यास स्पष्टपणे मनाई केलेली असेल किंवा जी माहिती प्रकट केल्यामुळे न्यायालयाचा अवमान होईल अशी माहिती तसेच संसदेच्या किंवा राज्यविधिमंडळाच्या विशेष

अधिकाराचा भंग होईल अशी माहिती त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहचेल आणि वाणिज्य क्षेत्रातील बौध्दीक संपदा, व्यावसायिक गुपिते, विश्वासार्हता यांचा समावेश असलेली माहिती किंवा एखाद्या व्यक्तीची वैयक्तिक माहिती अशा प्रकारची माहिती देणे बंधनकारक नाही असा स्पष्ट उल्लेख या अधिकारात केलेला आहे. यावरुन हे स्पष्ट होते की माहितीचा अधिकार हा मर्यादांचे उल्लंघन न करणारा आणि भारताचे सार्वभौमत्व, सुरक्षा, देशाच्या आंतरराष्ट्रीय संबंधांना, राष्ट्रीय ऐक्य यांना अबाधित ठेवणारा आणि भारतीय संविधानाचा सन्मान करणारा कायदा आहे.

३१) माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ मुळे जनतेच्या हातात शस्त्र आले आहे. त्याचा उपयोग सकारात्मक पध्दतीने व्हावा अशी अपेक्षा आहे. भ्रष्टाचारास प्रतिबंध घालण्यासाठी, सरकारी कामकाजात पारदर्शकता येण्यासाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्याला बळकटी आणण्यासाठी हा कायदा निश्‍चित हातभार लावेल, असाही एक निश्कर्ष या माहितीच्या अधिकार अधिनियम-२००५ च्या संशोधनात्मक अध्ययनातून प्रत्ययास येतो.

३२) महात्मा गांधींनी म्हटले होते, की जोपर्यंत केंद्रित असणारी सत्ता विकेंद्रित होऊन मतदारांच्या हाती येणार नाही, तोपर्यंत खरी लोकशाही अवतरणार नाही, याची दखल ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी घेतली आणि भारतीय लोकशाहीला अधिक सशक्त करण्यासाठी ग्रामसभेला बळकटी देण्याचा विचार मांडला आणि जनतेच्या

मागणीला दाद देत भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनाच्या माध्यमातून सहा वेळा अण्णा हजारे यांनी आंदोलने केली याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने ग्रामसभेला जादा अधिकार द्यावेत यासाठी कायदे केलेले आहेत. यावरुन असे प्रत्ययास येते, की अण्णा हजारे यांना सत्तेचे विकेंद्रीकरण अपेक्षित आहे. त्यासाठी त्यांनी ग्रामसभा सशक्तीकरणाचा मार्ग सांगितला आहे. विकासकामामध्ये पारदर्शकता यावी, आर्थिक व्यवहारामध्ये पारदर्शकता यावी अशी अण्णा हजारे यांची ग्रामसभा आणि ग्रामसभेच्या कायद्याच्या कार्यपध्दती कडून अपेक्षा आहे.

३३) प्रस्तुत संशोधन अहवालात 'ग्रामसभा' या घटकात महाराष्ट्र शासनाने ग्रामसभेला बळकटी देण्यासाठी जे कायदे केले आहेत, त्यांत मुंबई ग्रामपंचायत अधिनियम-१९४८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम, महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ यांची सविस्तर मांडणी केलेली आहे. या अधिनियमांच्या सविस्तर संशोधन अध्ययनातून असा निश्कर्ष प्रत्ययास येतो, की ग्रामसभेला जादा अधिकार हा कायदा भारतीय लोकशाहीला निश्चितच बळकटी प्राप्त करुन देईल. कारण केवळ केंद्रातील संसद आणि राज्यातील विधानसभा मजबूत असून भागणार नाही तर ही दोन्ही सभागृहे ज्या ग्रामसभेवर आधारित आहेत ती ग्रामसभाही तेवढीच सशक्त असणे आवश्यक आहे.

३४) ग्रामसभेला जादा अधिकार देऊन लोकशाही अधिक सुदृढ करण्यासाठी जसा अण्णा हजारे यांनी कायदा आणण्याचा प्रयत्न केला त्याप्रमाणे त्यांनी प्रशासनामध्ये, प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या कार्यपध्दतीत काही दोष दिसून येत होते, म्हणून त्याविरुध्दही आवाज उठवण्याचा प्रयत्न केला. प्रशासनातील ते दोष म्हणजे कर्मचाऱ्यांच्या वारंवार आणि अनियमित बदल्या होणे आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या कार्यपध्दतीमधील दोष म्हणजे कर्मचाऱ्यांच्या कामातील दप्तरदिरंगाई होय. याविरुध्द अण्णा हजारे यांनी आवाज उठवला. सरकारशी अनेक वेळा पत्रव्यावहार केला आंदोलने केली, सरकारशी संघर्ष केला. आणि शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध घालण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम प्रसिध्द करण्यास सरकारला भाग पाडले. दिनांक १२ मे २००६ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर प्रथम प्रसिध्द केलेला अधिनियम म्हणजे २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ या अधिनियमामागील ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचा हेतू प्रशासकीय कर्मचाऱ्यांची वारंवार होणाऱ्या बदल्यांमुळे होणारी ससेहोलपट थांबवणे, त्यांना सेवेत स्थिरता देऊन भ्रष्टाचार थांबवणे, तसेच प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या कार्यकुशलतेत वाढ करुन, लाचखोरी थांबवणे व प्रशासनात पारदर्शकता निर्माण करणे हा होय.

३५) सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ च्या भाग एक व दोनमध्ये शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यासंबधी तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार, तीन वर्षांत शासकीय कर्मचाऱ्याची बदली करु नये आणि तीन वर्षांनंतर संबंधित कर्मचाऱ्याला एका जागेवर ठेवू नये अशी तरतूद करण्यात आली आहे. निश्कर्षतः असे म्हणता येइल, की कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याची जर एखाद्या जागेवर बदली झाली तर त्याला तीन वर्षे त्या जागेवर सेवाशाश्वती निश्चितच मिळते. सेवाशाश्वतीमुळे आणि मानसिक दडपणा अभावी त्याच्या कार्यकुशलतेत निश्चितच वाढ होते.

३६) या अधिनियमान्वये जर एखाद्या कर्मचाऱ्याची तीन वर्षांची सेवा पूर्ण करण्यापूर्वी बदली करणे काही कारणांस्तव आवश्यक असेल तर मुख्यमंत्री, मुख्य सचिव यांनाच अधिकार असावेत असा उल्लेख करण्यात आलेला आहे. सारांशतः सेवा कालावधी पूर्ण करण्याअगोदर जरी एखाद्या कर्मचाऱ्याची बदली काही कारणांस्तव करणे आवश्यक असले तरी त्यासाठी फार मोठी, किचकट पध्दती असल्यामुळे प्रशासकीय कर्मचाऱ्यांना सेवाशाश्वतीचा निश्चितच आनंद मिळतो. पर्यायाने संबंधित कर्मचारी अधिक कार्यमग्न होऊन कार्यकुशलतेने कार्य करु शकतो.

३७) या अधिनियमाच्या निर्मितीपूर्वी प्रशासकीय कर्मचारी आपल्याला पाहिजे त्या ठिकाणी बदली करुन घेण्यासाठी आपल्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांची मनधरणी करुन किंवा

लाच देऊन बदली करुन घेत; परंतु या अधिनियमाच्या निर्मितीमुळे अशा प्रकारे होणाऱ्या भ्रष्टाचाराला निश्चितच आळा बसेल हे स्पष्ट होते.

३८) या अधिनियमाच्या निर्मितीपूर्वी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यावर बऱ्याच वेळा अन्याय होत असे. कारण त्याचा प्रामाणिकपणा स्थानिक लोकप्रतिनिधींना आणि अधिकाऱ्यांना आवडत नसे. त्यामुळे लोकप्रतिनिधी आपल्या मर्जीतील कर्मचाऱ्याची निवड संबंधित पदावर करीत; परंतु १२ मे २००६ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ च्या भाग एक व भाग दोनमधील तरतुदीनुसार अशा प्रकारच्या गैरव्यावहाराला आळा बसला आणि प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्याच्या कामातील अडथळा दूर झाला असे म्हणता येते.

३९) सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ च्या प्रकरण तीनमध्ये दप्तर दिरंगाईचा कायदा २००६ तील बाबींचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार कोणत्याही सरकारी कार्यालयातील एका टेबलवरील पेपर दुसऱ्या टेबलवर सात दिवसांच्या आत गेला पाहिजे. सात दिवसांच्या आत पेपर पुढे न गेल्यास संबंधित कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई व्हावी असा कायदा १२ मे २००६ रोजी राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द केला गेला. यामागील ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचा उद्देश सामान्य माणसाचा वेळ आणि पैसा यांचा अपव्यय थांबवणे हा होता असे म्हणता येते.

४०) अधिकांश सरकारी कार्यालयांमध्ये काही अधिकारी, कर्मचारी चिरीमिरी दिल्याशिवाय नागरिकांचे काम करत नव्हते. सतत कार्यालयात हेलपाटे मारणे सामान्य माणसाला ज्यांचे हातावर पोट आहे, ज्याचा मोलमजुरीवर उदरनिर्वाह होतो शक्य होत नसे. परंतू दप्तरदिरंगाईचा कायदा-२००६ च्या निर्मितीमुळे शासकीय कार्यालयांतील भ्रष्टचाराला आळा बसला आणि मानसिक ताण कमी झाला असे म्हणता येईल.

४१) या कायद्यामुळे सरकारी कार्यालयांतील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या बेबंदशाहीला आळा बसला; कारण सात दिवसांच्या आत आपल्या टेबलवरील कागदपत्रे पुढच्या टेबलवर पुढील कार्यवाहीसाठी न गेल्यास शिस्तंभंगाची कारवाई होणार या भीतीने अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर दडपण आले. परिणामी प्रशासकीय कामांना गती मिळाली असे म्हणता येईल.

४२) १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपण स्वतंत्र झालो. पहिली १०-१२ वर्षे सोडली तर नंतर स्वातंत्र्याला भ्रष्टाचाराचे ग्रहण लागले. गेल्या ३५-४० वर्षांत हे ग्रहण कलेकलेने वाढत गेले. आता तर भ्रष्टाचार नाही असे एकही क्षेत्र सापडणार नाही अशी अवस्था आहे. आज दरवर्षी भ्रष्टाचारामुळे केंद्र व राज्य सरकारचा दहा हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त तोटा होतो असे सी.बी.आय चे माजी संचालक माधवन यांनी ‘द स्टेट्समन’ या वृत्तपत्रातील एका लेखात लिहिले आहे. याची नोंद ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी घेतली आणि आडदांडपणे राजरोसपणे भ्रष्टाचार करणाऱ्या अनिष्ट प्रवृत्तींना

पायबंद घालण्यासाठी तसेच त्यासाठी जनसंघटन उभे करण्यासाठी 'भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन न्यास' ही संस्था स्थापन केली. अण्णा हजारे यांच्या कार्याचे व्यवस्थित अवलोकन केल्यास असा निष्कर्ष समोर येतो, की अण्णा हजारे यांनी एका बाजूला समाज, गाव, राज्य, देश सुधारणांकडे लक्ष देवून कार्य केले तर दुसऱ्या बाजूला भ्रष्ट शासन, भ्रष्ट प्रशासनाविरुध्द आंदोलने पुकारुन भ्रष्टाचाराची प्रवृत्ती नष्ट करुन शासन व्यवस्था व प्रशासन व्यावस्था यांत पारदर्शीपणा निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

४३) 'भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यास' या घटकाचा संशोधनात्मक अभ्यास करताना भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यास या संस्थेची ध्येय, उद्दिष्टे, संस्थेची मार्गदर्शक तत्त्वे निवडीचे निकर्ष/पध्दती, कार्यकारिणीस मान्यता देण्याची पध्दती, सभासदांना करावयाच्या कार्याची पंचसूत्री, ही संस्था एक परिवर्तनवादी चळवळ कशी आहे या घटकाचे सविस्तर अध्ययन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. निश्कर्षात असे म्हणता येइल, की या संस्थेने जी ध्येये, उद्दिष्टे, मार्गदर्शक तत्त्वे स्वीकारली आहेत त्यांत पूर्णतः भ्रष्टाचार निर्मूलना संबंधिचे तत्त्वे स्पष्ट करण्यात आली आहेत. त्याच बरोबर संस्थेच्या तालुका, जिल्हा समित्यांकरिता मार्गदर्शक तत्त्वे स्पष्ट करताना त्यांची रचना व कार्यक्षेत्रे स्पष्ट केली आहेत. सभासदांना करावयाच्या कार्याची पंचसूत्री अण्णा हजारे यांनी चारित्र्यसंपन्न, प्रशिक्षित सभासदांचे गट तयार करुन जनहिताच्या

कायद्याच्या अंमलबजावणीकरिता लोकशिक्षण, लोकजागृती, लोकसंघटन करुन लोकांना निर्भय बनवणे हा उद्देश साध्य केल्याचे प्रत्ययास येते.

४४) महात्मा गांधींचा संदेश होता, की जोपर्यंत सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन, ती सत्ता मतदारांच्या हाती येणार नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने लोकशाही अस्तित्वात येणार नाही. हा गांधींच्या संदेश अण्णा हजारे यांनी समोर ठेवला आणि भ्रष्टाचारविरोधी जनअंदोलन न्यास ही संस्था स्थापन केली. जिचा मुख्य उद्देश सत्तेचे विकेंद्रीकरण करुन सत्ता जनतेच्या हाती देणे व भ्रष्टाचारमुक्त बलशाली भारताचे निर्माण करणे हा आहे.

४५) माहितीचा अधिकार, ग्रामसभेला अधिकार, दप्तरदिरंगाई हे कायदे भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनाचेच फलित आहेत. यासाठी अण्णा हजारे यांना संपूर्ण महाराष्ट्रात अनेक वेळा लोकजागृतीसाठी आणि लोकशिक्षणासाठी दौरे करावे लागले. अर्थात हे सामाजिक कार्य करत असताना येणारा खर्च भागविण्यासाठी त्यांच्याकडे कुठलेही बँक बॅलन्स नव्हते. प्रत्येक दौऱ्यामध्ये सभा झाल्यानंतर जनतेपुढे आर्थिक मदतीसाठी झोळी ठेवली आणि जमणारी आर्थिक मदत संबंधित गावातील प्रतिष्ठित व्यक्तीसमोर समक्ष मोजून गावकऱ्यांना त्या पैशाची पावती दिली जाते आणि तो पैसा संस्थेच्या खात्यामध्ये जमा होतो. यावरुन हे स्पष्ट होते, की भ्रष्टाचारविरोधी व्यापक जनअंदोलन पुकारताना

आपल्याही हातून कळत नकळत जनतेने केलेल्या आर्थिक मदतीचा गैरव्यवहार होणार नाही यासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे दक्ष असतात.

अशाप्रकारे प्रस्तुत 'अण्णा हजारे गांधीवादी नेतृत्व' या संशोधन अहवालातून वरील काही महत्वपूर्ण निष्कर्ष प्रत्ययास येतात. ज्यांची सविस्तर मांडणी या संशोधन अहवालाच्या निष्कर्ष या सदरात करण्यात आली आहे.

## सारांश

'अण्णा हजारे गांधीवादी नेतृत्व' या प्रस्तुत संशोधन अहवालातील सारांश या घटकात संपूर्ण संशोधन अहवालातील सर्व प्रकरणांमध्ये व त्यातील सर्व उपघटकांमध्ये ज्या बाबींचा अभ्यास सविस्तरपणे करण्यात आला आहे, त्यांची सारांशरुपाने मोजक्या व समर्पक शब्दांत मांडणी करण्यात येणार आहे, ती खालीलप्रमाणे.

महात्मा गांधींच्या जीवनाची चार प्रमुख तत्त्वे होती सत्य, प्रेम, अहिंसा सत्याग्रह या तत्त्वांनिशी जगलेले राष्ट्रपिता गांधी हे खरोखरच महात्मा होत. सत्य, प्रेम, अहिंसा, सत्याग्रह या तत्त्वांच्या साह्याने गांधींनी जे कार्य केले त्यावरुन त्यांना युगपुरुष असेही म्हटले जाते.

आज एकविसाव्या शतकात हिंसाचार, जाळपोळ, दहशतवाद, लूटमार, हिंसा, भ्रष्टाचार, व्यभिचार, व्यसनाधीनता, वाढते शहरीकरण, खेड्यांचे परावलंबित्व, नक्षलवाद, धर्मवाद, जातिवाद या समस्यांनी केवळ भारतालाच नव्हे तर संपूर्ण जगाला ग्रासले आहे. या सर्व समस्यांवर मात

करण्यासाठी भारतात अनेकाने मार्गांनी प्रयत्न केले जात आहेत; परंतु असे प्रयत्न करुनही या समस्यांचे संपूर्ण निराकरण होत नाही. या सर्व समस्यांवर उत्तर शोधण्याचा यशस्वी प्रयत्न ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केले. त्यांनी केलेले यशस्वी प्रयत्न हे सर्व भारतीयांसाठी तर आदर्श आहेत; पण त्याच बरोबर आंतरराष्ट्रीय स्तरावरदेखील त्यांच्या कार्याचे कौतुक झाले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे अण्णा हजारे यांनी केलेले प्रत्येक विकासकार्य हे गांधीविचारांनी प्रेरित आहे. सत्य, अहिंसा, सत्याग्रह, आत्मक्लेश, ग्रामविकास, व्यसनमुक्ती, भ्रष्टाचार, व्यभिचार, स्वावलंबी खेडे, सर्व धर्म समभाव, अस्पृश्योध्दार, महिलोध्दार, शैक्षनिक कार्य, आर्थिक विकास ही गांधींची तत्त्वे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी कृतीत उतरविली आणि एक आदर्श उभा केला. याची नोंद व्हावी म्हणून अण्णा हजारे गांधीवादी नेतृत्व या अध्ययनविषयाची निवड केली आहे.

प्रस्तुत प्रबंधाचे अध्ययन एकूण सात प्रकरणांत करण्यात आले. प्रस्तावना या प्रथम प्रकरणात समाजव्यवस्था आणि राजकीय व्यवस्थेच्या वेगवेगळ्या कालखंडात त्यांच्या अध:पतनातून युगपुरुषांचा उदय कसा झाला हे स्पष्ट करुन प्रस्तूत अध्ययन विषयाची निवड का केली, संशोधनाची उद्दिष्ट्ये संशोधन पध्दती, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाचे स्वरुप, माहिती संकलन आदी घटकांचे अध्ययन करण्यात आले आहे.

प्रस्तुत संशोधन अहवालातील ‘गांधीवाद’ हे दुसरे प्रकरण होय. या प्रकरणात गांधीविचारांचे सविस्तर अध्ययन करण्यात आले आहे. सत्य, अहिंसा, सत्याग्रह, सत्याग्रहाची

साधने, धर्मविचार, शिक्षण विचार आदी गांधीविचारांचे अध्ययन करण्यात आले आहे. गांधीवादी विचारपरंपरेच्या अध्ययनाबरोबरच महात्मा गांधींचा एक अल्पपरिचय म्हणून ही अध्ययन प्रस्तुत प्रकरणात करण्यात आले आहे.

प्रस्तूत संशोधन अहवालातील तिसरे प्रकरण म्हणजे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे जीवनचरित्राचे आहे. या प्रकरणात ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचा व्यक्तिपरिचय देण्यात आला आहे. त्यांचे बालपण, बालपणातील कौटुंबिक माहिती, सैनिकी जीवनातील सैनिक म्हणून आलेले अनुभव, प्रसंग यांचे सविस्तर अध्ययन करण्यात आले आहे. सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर जनसेवा हीच ईश्वर सेवा मानून केलेल्या कार्याचा शुभारंभ, तसेच अण्णांच्या एकूण सर्व कार्याचा शासनाने आणि वेगवेगळ्या संस्था संघटनांनी केलेला गौरव, मिळालेले विविध पुरस्कार यांचा सविस्तर अभ्यास तिसऱ्या प्रकरणात करण्यात आला आहे.

'आदर्श गाव - राळेगणसिध्दी' हे या संशोधन अहवालातील चौथे प्रकरण होय. या प्रकरणात अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील राळेगणसिध्दी या गावाचे भौगोलिक स्थान, पर्जन्यमान, लोकसंख्या, पिके यांचे संशोधनात्मक अध्ययन करण्यात आले आहे. राळेगणसिध्दी या आजच्या आदर्श गावाचे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या योगदानापूर्वीची राजकीय, सामाजिक, आर्थिक स्थिती आणि अण्णांच्या योगदानातून राळेगणसिध्दीचा झालेला सामाजिक, राजकीय, आर्थिक, भौगोलिक विकास या सर्व घटकांचा सविस्तर अभ्यास केलेला आहे.

प्रस्तुत संशोधन अहवालातील पाचवे प्रकरण माहितीचा अधिकार, ग्रामसभा आणि इतर कायदे पारित करण्यातील अण्णा हजारे यांचे योगदान. या प्रकरणात खेड्यांच्या विकासाला गती मिळण्यासाठी आणि भ्रष्टाचाराला आळा बसविण्यासाठी विकासकामांचा दर्जा उंचावण्यासाठी माहितीचा अधिकार, ग्रामसभेचा अधिकार, बदल्यांसंबधीचा कायदा, दप्तरदिरंगाई विरुध्दचा कायदा व्हावा यासाठी अनेक आंदोलने केली. त्याचा उल्लेख या प्रकरणात केला आहे.

'भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यास' हे या संशोधन अहवालातील सहावे प्रकरण होय. या प्रकरणात भ्रष्टाचार म्हणजे काय? त्याची कारणे, त्यावरील उपाय या घटकांसहित भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यास ही कशाप्रकारे लोककल्याणासाठी काळाची गरज आहे यावरही अध्ययन करण्यात आले आहे. त्याचबरोबर भ्रष्टाचारविरोधी जनअंदोलन न्यासाच्या जिल्हा/ तालुका कार्यकारिणीच्या निवडीचे निकष, मान्यता देण्याची पध्दती, सभासदांना करावयाच्या कार्याची पंचसूत्री या घटकांवरही अध्ययन केले गेले आहे.

'निष्कर्ष आणि सारांश' हे या संशोधन अहवालातील शेवटचे आणि अंतिम प्रकरण होय. या प्रकरणातील निष्कर्ष या घटकांत या संशोधन अहवालातील पहिल्या सहा प्रकरणांच्या सविस्तर अध्ययनातून जे निष्कर्ष प्रत्ययास आले, ते विस्तृतपणे मांडले आहेत. तसेच 'सारांश' या घटकात संशोधन अहवालातील सर्व प्रकरणांची मांडणी मोजक्या आणि समर्पक शब्दांत केली आहे.